नि.दि.दा.क्र.- ६७/२०१९

नि.क्र. १४ पुढे

कुंदा जिवतु शिंगाडे

**साक्षीदराचा उलटतपास प्रतिवादीतर्फे त्यांचे वकील श्री. पी.पी.यादव यांचेमार्फत शपथेवर सुरु**-

मी पाचवी पर्यंत शिकलेली आहे. मला केसबद्दल माहिती आहे. माझा मुलगा राहुल हा बारावी पर्यंत शिकला आहे. मी प्रतिवादीच्या जागेचा क्रमांक तसेच घर क्रमांक सांगु शकत नाही. प्रतिवादीने कोणत्या बँकेतुन किती लोन घेतले हे मी सांगु शकत नाही. मी प्रतिवादीच्या लोनच्या संदर्भात कोणतेही कागदपत्रे दाव्यासोबत दाखल केलेले नाही. प्रतिवादीचे किती कर्ज राहिले होते यासंदर्भात मी कोणताही उल्लेख केलेला नाही. मी माझ्या बँकेचे आर.डी. नंबर सांगु शकत नाही. मी बँकेतुन पैसे काढल्याचे दस्त दाव्यासोबत दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने बँकेतुन कर्ज काढले होते ते कर्ज फेडण्यासाठी माझेकडुन पैसे घेतले हे मी खोटे सांगत आहे. दिनांक ९/०३/२०१९ रोजी मी पोलीसांना तक्रार केली होती त्याचा उल्लेख माझ्या नोटीसीमध्ये केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की आता नोटीस बघीतला असता तसा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दिनांक ९/०३/२०१९ रोजी कोणतीही तक्रार केली नव्हती म्हणुन तसा उल्लेख माझे नोटीसीमध्ये नाही. मी प्रतिवादीकडे पाच वर्ष झाडलोट, भांडी घासने अशी कामे केली. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी हा जिल्हा परिषद येथे शिक्षक म्हणुन काम करतो. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीला चांगला पगार मिळतो. याबद्दल मला माहिती नाही की प्रतिवादी त्या पैशाने स्वतःच्या जबाबदा-या व कर्ज फेडु शकतो. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी हे मला त्याच्या घरातील सदस्याप्रमाणे वागणुक देत होते. प्रतिवादी हे सकाळी कामावर जात होते व सायंकाळीच घरी परत येत होते. हे म्हणणे खरे नाही की मी व्यवस्थीत काम करत नाही म्हणुन प्रतिवादीच्या पत्नीसोबत माझे भांडण होत असे. हे म्हणणे खरे नाही की आमचे छोटया मोठया गोष्टीवरुन भांडने होत होती. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे प्रतिवादीने मला कामावरुन काढले होते. हे म्हणणे खरे नाही की या कारणामुळे त्याला बेईज्जत करण्याची धमकी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की मी त्यांच्याकडुन पैसे वसुल करण्यासाठी व त्यांना बेईज्जत करण्यासाठी मी खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने मला कोणतेही कागद लिहुन दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की नि.२०-अ हे मी व माझे मुलांनी खोटे तयार केलेले आहे . हे म्हणणे खरे नाही की मी कोणतीही पोलीस तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

माझे समक्ष.

सह.दि.न्याया.क.स्तर,<br>
कामठी.<br>
दिनांक १७/११/२०२१.

(एस.एस.गाडवे)<br>
सह. दिवाणी न्यायाधीश कनि. स्तर,<br>
कोर्ट नं. २, कामठी.

नि/सं.फौ. ख.क्र.- ....../२०

सरकार वि. .............

नि.क्र. .........

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. यांचा साक्षपुरावा-**

मी शपथेवर असे कथन करतो की,

माझे नाव - …..................................,

वय - …....वर्षे, व्यवसाय- …......,

राह. - …..................................,

…............ , जिल्हा- नागपुर.

**साक्षीदाराचा सरतपास वादी/प्रतिवादी करीता त्यांचे वकील श्री./श्रीमती ........ यांद्वारे शपथेवर सुरु-**

.................

**साक्षीदराचा उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री. ........यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. माझे समक्ष.

न्यायदंडाधिकार प्र.वर्ग, (एस.एस.गाडवे)

कामठी. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांक .../...../२०..... कोर्ट नं. २, कामठी.